संक्षिप्त फौ. ख. क्र. ३५८/२०२१
सरकार -वि.- उमेश
नि.क्र. ११ खाली.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - निखील पुरुषोत्तम गजभिये,
वय ३० वर्षे, व्यवसाय – खाजगी,
राहणार – नांद, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री जी.बी.राऊत यांचे मार्फत**

१. मी आरोपीला ओळखतो. दिनांक १८.०९.२०२१ रोजी पोलिसांनी मला कोठेही बोलाविले नव्हते. मी जात असताना पोलिसांनी माझी सही घेतली. पोलिसांनी माझ्या समक्ष कुठलीही कारवाई केली नव्हती. आता मला सुचनापत्र व घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्यावरील सहीला **नि.क्र.१३** देण्यात येते.
सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८.०९.२०२१ रोजी पोलिसांनी मला मौजा नांद ता. भिवापूर येथे पंचनाम्याकरीता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे समक्ष आरोपीच्या ताब्यातुन १८ देशी दारुच्या निपा जप्त केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी

मला पंचनामा वाचून दाखविला व त्यानंतर माझी सही घेतली. मी राहुल डांगेला ओळखत नाही.  हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

३. नाकारला.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक - ०४.०२.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.